International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक विचार

**सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे[1] प्रा. डॉ. किशोर वि. साबळे[2]**
1संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्र, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
2सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री शिवाजी कला व वाणिज्य, महाविद्यालय, अमरावती
*Corresponding Author-* सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे
Email- subhashgotphode@gmail.Com

**सारांश :**

महाराष्ट्रातील घनदाट जंगले, दुर्गम डोंगर कड्यात येण्याचे धाडस महमंद गझनीने केले नाही. मात्र पुढे 1347 मध्ये संपूर्ण महाराष्ट्रावर परकीय मुसलमानांची राजवट सुरु झाली. मावळयांचे प्रमुख मराठे सरदार परकीय मुसलमानांची भाकरी मिळवण्यासाठी चाकरी करु लागले. त्यांना वतने, जहागिरी मिळू लागली. शिरळीकर, कोंढाळकर, मोरे, जाधव, मोहिते, शिर्के, पासलकर, ढमाले, मारणे, जेथे, शिरळीकर, कोंढाळकर, मोरे, जाधव, मोहिते, महाडिक आदि मराठ्यांना बारा मावळ खोऱ्यात देशमुखी, पाटीलकी, वतने, इनामे देऊन परकीय मुसलमान खुश करीत होते. त्यामुळे मावळ खोऱ्यात सर्वत्र मुसलमानी सत्तेचा उन्मत कारभार सुरु होता. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमुख किंवा पाटील यांच्याकडे होती. उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय होता. अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारित होती.गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्यागावची व्यवस्था पूर्वीसारखीच (आर्थिक स्थित) असे सहाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता. मराठा सत्तेच्या उदयाच्या वेळी महाराष्ट्रातील समाजात जातिव्यवस्था प्रचलित होती. समाजात अनेक जाती, जमाती आणि उपजाती होत्या. या प्रत्येक जाती-जमाती आपल्या धर्माचे पालन करीत असत. समाजात विविध जाती अस्तित्वात होत्या. प्रत्येक जाती, उपजाती व जमातीचे स्वतंत्र रीतिरिवाज असत जाती उपजाती नुसार उदरनिर्वाहाचे साधन ठरलेले होती त्यामुळे ठरलेला व्यवसाय करणे बंधनकारक होते तो व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय केला तर पाप लागेल व त्यामुळे पुढील सात जन्म नरकात जावे लागेल म्हणून जातीनुसार लोक व्यवसाय करीत असे इत्यादी निमाचे पालन करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे त्याकाळातील लोकांमध्ये फार कौशल्य विकसित झाल्याचे दिसत नव्हते. शिवकाळ शेतकरी कल्याणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर स्वराज्याचे अर्थव्यवस्था अवलंबून होती. शेतकरी सुखी तर राजा सुखी अशी त्याकाळी छत्रपती शिवरायांनी अर्थनिती असल्याचे दिसून येते, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय दृष्टिकोनामुळे व अमलात आणले आणलेल्या सुधारणामुळे त्यांना मानवी इतिहासात होऊन गेलेल्या श्रेष्ठ योग्यतेच्या प्रशासकामध्ये गणल्या गेले.

**Key-words :** छत्रपती शिवाजी महाराजांचेआर्थिक विचार, महाराजांनी सैन्याला वेतन पद्धती सुरू करणे, आर्थिक हिशोब ठेवणे. शिवकालीन शेती, शिवकालीन व्यापार, महाराजांचा प्रशासकीय दृष्टीकोण.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या इतिहासात त्याच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे तसेच भौगोलिक रचनेमुळे अर्थव्यवस्थेला महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी मिळालेली दिसून येते. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर

होणारा परिणाम हा सातत्याने राजकीय आणि आर्थिक-समाज जीवनावर विशेष प्रभाव टाकत असतो. महाराष्ट्राच्या हवामानाचा महाराष्ट्रीयन संस्कृतीवरही विशेष प्रभाव पडलेला आढळून येता. महाराष्ट्रातील जंगलांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेत व शिवकालीन राज्य स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. मराठ्यांना सह्याद्रीचे वरदान लाभले होते. सह्याद्रीच्या उंचउंच शिखरांवर असलेले किल्ले ही मराठ्यांची शक्तीस्थाने होती. घनदाट अरण्ये मुसळधार पाऊस, भयंकर दऱ्या, नदीनाल्यांचे पूर व जंगली जनावरे या निर्सगाच्या रुपाशी मराठे परिचित होते. कारण सह्याद्राची भूमी ही त्यांची जन्मभूमी होती. याउलट मैदानी प्रदेशात कोरड्या हवेत राहणाऱ्या मोगलांना महाराष्ट्रातील निसर्गाचे स्वरुप रौद्र व भयानक वाटत होते. सह्याद्रीविषयी उदगार काढतांना ग्रँट डफ म्हणतात. "शत्रूचा मार्ग अडविणारा सर्वात मोठा नैसर्गिक अडथळा म्हणजे उंच व रुंद सह्याद्रीची रांग होय." मावळ व घाटमाथा या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातील घनदाट जंगलांनी वेढलेले तसेच तीव्र उतारामुळे दुर्गम असलेले अनेक नैसर्गिक डोंगरी किल्ल्याचे शत्रूच्या स्वारीच्या वेळी रयतेचे संरक्षण करीत असे. महाराष्ट्रातील अशा डोंगराळ, जंगली दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशांचा मराठ्यांना सदैव फायदा झालेला होता. यामुळे ते गनिमी काव्याच्या पद्धतीत निपुण झाले होते.

धर्मनिरपेक्ष स्वराज्याच्या प्रशासनासाठी त्यांनी निर्माण केलेले दंडक आजही लोकशाहीच्या युगात प्रेरणादायी व आदर्शभूत ठरावेत असे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्ष स्वराज्य लोकशाही राज्य होय. भारताच्या इतिहासात समतेला महत्त्व देऊन 'मराठा' या वृत्तीवाचक समुहातील कायस्थ प्रभू, कुणबी, माळी, कुंभार, न्हावी, मराठे, लोहार, धनगर, रामोशी, कोळी, मातंग, महार, मुसलमान, या सर्वांना स्वराज्य घडविण्यासाठी सैन्यात घेतले. त्यांच्या वकुबाप्रमाणे त्यांना अधिकार व पदे दिली. समता व एकतेच्या महान तत्त्वाचा स्वराज्य स्थापनेत खरा उपयोग करुन घेतला. स्वराज्य स्थापनेबरोबर कडक असे निर्बंध घातले होते. "दौडीत बाया-बापड्यांवर हात टाकू नये, हात टाकले तर कलम केले जातील अशा शिक्षा देणे. मोहिमेत बाई, बटकीण, बायको बरोबर असू नये अन्यथा गर्दन मारली जाईल. छावणी टाकताना गावाच्या बाहेर टाकावी. पाणवठ्यावरील पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर करु नये. अन्यथा जनतेला पाणी पुरणार नाही. अशा प्रकारच्या सूचना व नियम सैनिकांना दिले होते.

अर्थव्यवस्था पाहण्याकरिता प्रशासनात सरनोबत, मुजुमदार व कारकून यांना सक्त आदेश होते. शत्रूंच्या बायका-मुलांना हात लावू नये. देवालयांची नासधूस करु नये. सक्तीचे धर्मांतर व शेतकऱ्यांचे बैल लुटू नयेत. नाईलाज म्हणून ओझे वाहण्याकरिताच त्यांचा वापर करावा व त्यासाठी लोक त्यांना मदत करीत होते. यावरुन शुत्रूपक्षातील जनता त्यांना विरोध करीत नव्हती. शत्रूपक्षातील जनतेची काळजी स्वत:च्या स्वराज्यातील रयतेची काळजी व आपल्या सैन्याची काळजी हे सैनिकी व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती. प्रशासनात विविध जातीमधील गुण ओळखून त्या पद्धतीचे काम त्यांच्यावर सोपविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या सहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंताना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती व ती तंतोतंट पाळली जात असत. पण हे करताना जाती-जातीतला भेदभाव संपविला. सैन्यप्रमुख वेगळा, दारुगोळयाचा प्रमुख वेगळा, हिशेब ठेवणारा वेगळा, सबनीस, कारखानीस, हवालदार असे जरी अधिकारी होते, परंतु सर्वांचा दर्जा एकच. सर्वांना

नियम एकच. फक्त त्यांच्या वकुबाप्रमाणे कामे वाटून दिली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळी राज्यकारभारात व न्यायदानात सर्वत्र फारसी भाषा वापरली जाई. परंतु त्यांनी राज्यव्यवहारकोश तयार करुन घेतला व मराठी भाषेचा वापर चालू केला. म्हणूनच शिवाजी महाराजांना 'फारसीचा पहिला कोशकार' म्हणून संबोधले आहे. त्या काळातील ही एक क्रांतिकारी कृती होती असे दिसून येते वरील प्रमाणे अनेक उपाय व्यवस्था अर्थव्यवस्था भरभराटीस येण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे अनेक दाखले आपल्याला इतिहासात पहावयास मिळते.

**उद्दिष्ट्ये :**

1. प्रस्तुत संशोधन हे पुढील उद्दिष्टांना विचारात घेऊन पूर्ण करण्यात आले आहे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेपूर्वीच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक आर्थिक व सांस्कृतिक स्थितीचे अध्ययन करणे.
3. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमागील भूमिकांचे अध्ययन करणे.
4. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व प्रशासन व्यवस्थेचे अध्ययन करणे.

**गृहितके :**

1. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सैन्याला व प्रशासकीय अधिकारी यांना आर्थिक शिस्त लावली आहे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष हिंदवी स्वराज्य निर्मिती करीत असताना अर्थव्यवस्थेला आर्थिक शिस्त लावली आहे.
3. उपरोक्त गृहितके समोर ठेऊन शोध निबंध तयार केले आहे.

**संशोधन पद्धती :**

ऐतिहासिक संशोधन पध्दती उपलब्ध मुळ व दुय्यम साधनांची क्रमवार व संगतवार मांडणी करून शोधनिबंधाच तयार करण्यात आला आहे. उपलब्ध साधनांचे तत्कालीन, सामाजिक धोरणाच्या संदर्भात विश्लेषण करून अनुमान पध्दतीने निष्कर्ष काढण्यात आले आहेत. ऐतिहासिक पुराव्याची छाननी करून त्यातील घटकांची ऐतिहासिक पध्दतीने निश्चिती करून त्यांचा स्वीकार करून व स्विकृत घटनांची क्रमवारीता ठरविण्यात आली आहे. सर्व निष्कर्ष वस्तुनिष्ठ पध्दतीने काढण्यात आले आहे

**संदर्भ साधनांची उपलब्धता :**

संशोधन विषयाच्या संबधीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याच्या अनुषंगाने स्वराज्याच्या कालावधीतील अधिकृत व मान्य बखर, आज्ञापत्र, राजपत्रे, व सर्व लिखीत, प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथसंपदा, टिपणे, परिपत्रके, अहवाल, इत्यादीचा आधार घेतला आहे. व विषयासंबधी सर्व पैलूंचे ऐतिहासिक साधनांचे परिशिलन करून निष्कर्ष काढण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा 19 फेब्रुवारी 1630 रोजी जन्म झाला. तीनशे वर्षाच्या काळोखानंतर महाराष्ट्रात सुर्योदय झाला. मातोश्री जिजाबाईने आपल्या पुत्रास शिवाजी हे सार्थ नाव दिले. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात 13 व्या शतकापासून ते 17 व्या शतकापर्यंत जवळपास 500 वर्षापर्यंत सतत दहशत, पराधिनता, जुलूम आणि संकटे यांना तोंड देत देत येथिल प्रजा या आशेवर होती की, कधीना कधी स्वराज्य येईल आणि आपले दुःख दूर होईल, भारतीय समाजाचे हे सामुहीक स्वप्न प्रत्यक्षात साकारणारे छत्रपती शिवाजी महाराज एक युगपुरूष ठरले.

उत्तरेला नर्मदा, दक्षिणेला पंचगंगा, पश्चिमेस अरबी समुद्र आणि पुर्वेस वैनगंगा ह्यामधील त्रिकोणात्मक प्रदेश महाराष्ट्र मानला जात होता. या प्रदेशातील उत्तर सिमेवर सातपुडा व विंध्य पर्वताच्या रांगा तर त्याखाली दक्षिणोत्तर 500 मैल पसरलेल्या पश्चिम घाट व सह्याद्री ह्यामुळे महाराष्ट्र मुख्यतः पहाडी प्रदेश बनला. कोकण, सह्याद्रीचा पहाडी भाग आणि मैदानी प्रदेश

हे महाराष्ट्राचे मुख्य भाग होते. या पहाडी प्रदेशात मराठ्यांचा उदय झाला. मराठ्यांच्या उदयास महाराष्ट्राची भौगोलिक परीस्थिती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, सावतामाळी, चोखामोळा इत्यादी विविध जाती धर्मातील संतांचे कार्य, मराठी एकच बोली भाषा, विजयनगरच्या हिंदू राज्याचे पतन, मोगल शासकाची महत्वाकांक्षा, बहामणी राज्याचे खच्चीकरण, 'महाराष्ट्र धर्म' कल्पनेचा प्रभाव, गनिमी काव्याची परंपरा व छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व इत्यादी बाबी कारणीभूत ठरल्या.

**हिंदवी धर्मनिरपेक्ष स्वराज्य स्थापनेपूर्वी महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती :**

महाराष्ट्राच्या इतिहासात त्याच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्यसाधारण असून; भौगोलिक रचनेमुळे महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी मिळालेली दिसून येते. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा सातत्याने राजकीय आणि आर्थिक-समाज जीवनावर विशेष प्रभाव टाकत असतो. महाराष्ट्राच्या हवामानाचा महाराष्ट्रीयन संस्कृतीवरही विशेष प्रभाव पडलेला आढळून येतो.

**महाराष्ट्राची भू-रचना :**

महाराष्ट्राचा पश्चिम भू-भाग हा अरबी समुद्रापासून पूर्वघाटापर्यंत पसरलेला असून दक्षिणेचा काही भाग कृष्णा नदीच्या हद्दीपर्यंत पोहोचलेला आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेला तापी नदी वाहत असून तिला लागूनच सातपुडा पर्वताच्या रांगा उभ्या आहेत.'महाराष्ट्राचा भूभाग 161/2 उ. ते 22 उ. अक्षांशावर आणि 721/2 पू. ते 81 पू. रेखांशावर असून त्याने एकूण 1.18 लाख चौरस मैल प्रदेश व्यापलेला आहे.'[1] महाराष्ट्राच्या उत्तरेला सातपुडा आणि विंध्य हे दोन पर्वत एकमेकास समांतर असून; ते पूर्व-पश्चिम दिशेला पसरलेले आहेत. या पर्वताच्या मध्य नर्मदेचे खोरे असून सातपुड्याला समांतर अशा तापी आणि नर्मदा यासारख्या नद्या वाहत असतात.

**धर्मनिरपेक्ष हिंदवी स्वराज्य स्थापनेपूर्वीची आर्थिक स्थिती :**

शिवपूर्वकाळात महाराष्ट्र हा एक भौगोलिक दृष्टया डोंगराळ, खडकाळ, अरण्य प्रदेश असून इथे एतद्देशिय असे नाग, भिल्ल, कोळी, मावळे इत्यादी लोक राहत असत. महाराष्ट्राच्या व मराठी भाषेच्या जडणघडणीला खरी सुरुवात प्रामुख्याने यादवकाळातच झाली असे म्हणावयास काही हरकत नाही.

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमूख किंवा पाटील यांच्याकडे होती. उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय असल्यामुळे सर्वस्वी त्यांचे जीवन त्यावरच अवलंबून होते. गावातील व्यवस्था, व्यापार किंवा त्यांची देवाण घेवाण गावातील उद्योगावर विसंबून होती. गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्या गावची व्यवस्था पूर्वीसारखीच असे सहाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता.

**शेती :**

"महाराष्ट्राचा प्रदेश दख्खनच्या पठारात मोडत असून त्यातील शेतीची सुरुवात ताम्रपाषान युगात झाली."[2] महाराष्ट्रात शेतीची अर्थव्यवस्था सामान्यपणे शतकानुशतके जशी होती तशीच शिवपूर्वकाळातही होती. शेती मालाचे उत्पादन हे मुख्यत: वेगवेगळया पिकांना लागवडीस योग्य अशी उपलब्ध जमीन, जमिनीचा कस व तीचे घटक, जमिनीचा मगदूर, प्रदेशांचा उंचसखलपणा, हवामान, पावसाचे प्रमाण, सिंचित क्षेत्र, दुष्काळ, उपलब्ध अवजारांचे उत्पादन, पिके, पिक घेण्याच्या पध्दती, खते, सैन्यांच्या किंवा चोरांच्या धाडी इत्यादीवर अवलंबून होते. यातील कोणत्याच

घटकात पूर्वीपेक्षा फारसा फरक पडलेला दिसत नाही.' 'कोकणात भात व देशावर जोधंळा व बाजरी ही मुख्य पारंपारिक पिके होती. कापूस, निळ, तंबाखू, भुईमूग अशा एक किंवा अधिक नगदी पिकांच्या उत्पादनाला व्यवसाय योग्य प्रमाणात नव्याने कुठे सुरवात झाली असेही घडले नाही.''[3] शेतांची खरेदी-विक्री व इतर हस्तांतर रुढ पध्दतीने चालू होते. अर्थात हे व्यवहार गावकऱ्यांच्या संमतीनेच होत शेतीची खरेदी होई किंवा एखाद्या वाणी-सावकाराकडे किंवा नगरवांसीयाकडे शेतीची मालकी येई. परंतु शेतीत भांडवली पध्दतीने पैसा घातला असे झाले नाही. तसे होण्यासारखी आर्थिक परिस्थितीही नव्हती.

शिवपूर्वकाळात शेतीचे 'पांढरी' व 'काळी' असे दोन भाग पडले होते. गावाची वसाहत पांढऱ्या मातीच्या जमीनीवर केली जात असे. ज्या जमिनिमध्ये पीक घेतले जात असे त्या जमिनीस काळी असे म्हटल्या जाई. काळया जमिनीचे प्रत्यक्ष दोन भाग पडतात. प्रत्यक्ष लागवडीखाली असणारी लागवडीखालील जमीन आणि नापीक पडीत जमीन. अशा पडीत जमिनीचा वापर गावकरी गुराढोरांना चाराऊ रान म्हणून वापरत. अशा रानास 'गायरान' असे म्हणत. एकुण सर्व जमिनेचे मालक सरकार असले तरी, प्रत्यक्ष सरकार जमीन कसू शकत नाही. त्याकरिता सरकारला मोबदला 'खंड' म्हणून भरत असे. म्हणजे रयत सारा सरकारला भरत असे. शासन काही जमीन धार्मिक संस्थांना इनाम म्हणून देत असे. त्या जमीनी सारामुक्त असे. गावाच्या जमीनीपैकी 20 टक्के जमीन अशा पध्दतीने काही धार्मिक संस्थांना इनाम म्हणून दिली जात असे. सरकारच्या धोरणानुसार कसण्याची जबाबदारी त्या शेतकऱ्यावर असे. सरकारच्या विरोधात वर्तन केल्यास ती इनामी जमीन काढून घेतली जात असे. शेती व्यवसाय हा समाजातील प्रमुख व महत्त्वाचा मानला जात असे. कारण शेतीचे उत्पन्न हेच खरे राज्याचे उत्पन्न होते. म्हणून सरकारसुध्दा शेतीच्या प्रश्नाविषयी जागृत होते. पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने जमिनीचे 'बागायत' व 'जिरायत' असे दोन प्रकार केले जात असे. छोट्या छोट्या ओढ्या-नाल्यावर किंवा नद्यांवर लहान लहान बंधारे बांधून त्यातील पाणी पाटांनी शेतीत पुरविले जाई. अशा जमिनीस 'मोटस्थल' जमिन असे म्हणत.[4] काही जमिनींना छोट्या ओढ्यांना बंधारा घालून जमिनीच्या उंचीचा फायदा घेऊन पाणी पुरविले जात असे. अशा जमिनीस फुग्याखालील जमिन असे म्हणत.

शिवपूर्वकाळात शेतीची मोजनी हा महत्त्वाचा घटक होता. जमीन मोजनीसाठी काठीचा वापर केला जात असे. ही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. एक हात सात मुठीचा व एक मूठ दोन तसूंची असे. याप्रमाणे प्रमाण मानले जाई. एक मूठ म्हणजे अंगठ्या जवळचे बोट व करंगळी मधील अंतर व एक तसू म्हणजे दोन बोटांच्या सांध्यातील अंतर मानले जाई. अशा प्रकारे पाच हात व पाच मुठी यांनी बनविलेल्या वीस पौरस काठ्यांना मिळून एक 'पांड' तयार होई. अशा वीस पांडांचा मिळून एक 'बिघा' होई. 120 चौरस बिघे मिळून एक 'चावर' होई. कोकणात विस औरस-चौरस पांडाऐवजी तेवीस औरस-चौरस पांडांचा उक बिघा मानला जाई. सरकारी अधिकाऱ्यांबरोबर जमिनी मोजणीचे काम वतनदार तराळ करीत असे. त्याच्या हाती ही काठी असे व तो जमीन मोजत असता काठी उडवित असे. त्यामुळे या काठीस त्या काळी 'चलती काठी' असे म्हणत. अशा प्रकारे काठी उडी घेत असल्यामुळे बिघ्यातील काठ्यांची संख्या सर्वत्र सारखीच राहते असे नाही. तेव्हा लांब दोर धरुन अंतर सारखे केले जाम असे. शेतीची मोजनी अधिकात अधिक बरोबर रास्त केली जात असे. सततच्या युध्दजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना शेतीमधून फारसे उत्पादन करणे शक्य होत नसे. गावेच्या गावे जाळपोळ करुन उजाड केली जात होती. शेतीची नासधूस, पाण्याचे स्त्रोत खराब करणे, वस्ती करण्याजोगे स्थानांचा नाश होत

असल्याने उपासमार आणि दारिद्रय हे ठरलेलेच होते. याही स्थितीमध्ये जे उत्पादन हाताशी येईल त्यामधूनच महसूल द्यायचा यामुळे या कष्टकरी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची होऊन जात होती.

**व्यापार :**

तेराव्या शतकातील उत्तरकालीन यादवांचा काळ सोडल्यास सतराव्या शतकापर्यंत हा प्रदेश मुख्यत्वे आंध्र, कन्नड, आणि तुर्क पठाणादी मुसलमान अशा राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालीच होता. परकीय साजवटीखाली वावरताना तत्कालीन मराठी समाजाची आर्थिक परीस्थिती एकंदरीने बेताच्याच उंचीची राहिली असावी.[5] “इ.स. 760 ते 973 पर्यंत महाराष्ट्रावर कन्नड राष्ट्रकुटांनी राज्य केले; त्यामुळे त्याकाळची वजने, मापे, नाणी यांची नावेही कन्नड भाषेतीलच होती. एतद्देशीय मराठा, नाग, कोळी, भिल्ल इत्यादी डोंगरी मराठी लोक त्यांच्या बलुत-सांस्कृतिप्रधान अलग, स्वयंशासित खेड्यातून बव्हंशी त्याकाळी वास्तव्य करून राहत असावेत. बलुत्यातील बलुतेदाराप्रमाणे जवळ जवळ एतद्देशीय मराठी, वाणी आपल्या व्यवसाय वृत्तीची कामे करीत असावमत असे दिसते. यादवकाळातसुध्दा देशावरील मोठ्या प्रमाणावरचा व अंतर्गत व्यापार कन्नड, वैश्य व लिंगायत वाण्यांच्या हातात, तर कोकण समुद्र किनाऱ्यावरील परदेशांशी व्यापार बव्हंशी गुजराती, अरब इत्यादींच्या हातात होता असे दिसते.”[6] इ.स. 1294 मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर केलेल्या आक्रमणानंतर मात्र् पुढे चारशे वर्ष महाराष्ट्राच्या बहुतांश भागात मुसलमानांचे आर्थिक वर्चस्व होते असे दिसून येते. बहामनी सुलतानाच्या काळात चौल, दाभोळ, जुन्नर, दौलताबाद, पैठण ही महाराष्ट्रातील महत्त्वाची व्यापारी केंद्रे परकीय मुसलमानी व्यापाराच्या हातात होती. पंधराव्या शतकाच्या अखेरीस नागोठणे, चौलसह कोकणचा समुद्रकिनारा गुजरातचा मुसलमान राजा महमुद बेगडा ह्याच्या ताब्यात होता; आणि शेवटी इ.स. 1509 मध्ये चौलसह कोकणचा समुद्रकिनारा पोर्तुगीजांच्या ताब्यात गेला.

कोकण किनाऱ्यावरील व्यापारामध्ये प्रामुख्याने अरब, तुर्की, इराणी, हिंदी, मुसलमान, गुजराती, पोर्तुगीज होते आणि त्यांचा व्यापारावर अंमल होता. मात्र इथल्या भुमिपुत्रांना केवळ व्यापारी गलबतावर माल चढविणे आणि उतरविणे असे हमालीचे काम किंवा फार छोट्या प्रमाणावर किनाऱ्यालगतचा व्यापार एवढ्यापुरतेच ते मर्यादित होते असे दिसून येते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यापरील यूरोपिय व्यापार व त्याद्वारे होणारी भांडवली गुंतवणूक देशाच्या अर्थकारणात प्रभावी ठरू लागली व या नव्या आर्थिक घडामोडीचा गुजराती व अन्य व्यापारी फायदा घेऊ लागले होते.[7] मात्र मराठी माणसे ह्या युरोपिय घडामोडीपासून अलिप्त होती असे दिसते.

**वतने व वतनदार :**

महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागात लहान प्रमाणावर व्यापार करणारे लोक होते. एखादी विशिष्ट वस्तू किंवा सेवा गावात किंवा संबधित प्रदेशात विकणे अशासाठी व्यावसायिक वतने असत. वतनदार विक्रेत्याला किंवा कारागिराला त्याच्या वतनापत्रात उल्लेखितप्रमाणे गावातील इतर वतनदारांना व गावअधिकाऱ्यांना आपल्या वस्तू व सेवा नेमून दिलेल्या प्रमाणात विनामूल्य द्याव्या लागत. व्यापारासाठी काही मर्यादेपर्यंत या वतनसंस्थेचा उपयोग होई. पण त्यातील संकुचित कार्यक्षेत्र, चढाओढीचा अभाव, मालाच्या किंवा सेवेच्या गुणवत्तेला गौणस्थान इत्यादी मर्यादेमुळे संबंघित व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ शकला नाही. गावं जवळ जवळ स्वयंपूर्ण होती त्यांची स्वयंपूर्ण यंत्रणा होती. पाटील, कुलकर्णी, बारा बलुते गाव चालवत होती. सत्ता बदलली तरीही गावाला फारसा फरक पडत नव्हता. वतनदार हे भरमसाठ वसुली करीत होते, जनतेवर अन्याय करीत होते. त्यांच्या विरुध्द दाद

मिळत नव्हती आणि कोणी मागतही नव्हते. राजे बदलले तरीही कुलकर्णी, पाटील, वतनदार, देशमूख, जहागीरदार तेच असत. वतनदार स्वत:ची वतने शाबूत राखण्यासाठी राजांशी एकनिष्ठ असत.[8]

**दुष्काळ :**

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळामुळे सुध्दा महाराष्ट्रातील जनतेची आर्थिक स्थिती हलाखीची बनत गेली. महाराष्ट्रात इ.स. 1396 ते 1408 पर्यंत बारा वर्ष दुर्गादेवीचा दुष्काळ पडून सर्वत्र अवर्षण निर्माण झाले होते.[9] यामध्ये महाराष्ट्रात शिरवळ व खटाव प्रदेशाचा अंतर्भाव असल्याचे दिसून येते. इ.स. 1422 ते 1423 या वर्षी संपूर्ण दख्खनच्या प्रदेशात पावसाअभावी तीव्र दुष्काळ पडला. त्यामुळे कित्तेक जनावरे मृत्युमुखी पडली. बहामनी सुलतान अहमदशहाने आपल्या लष्करातील शिपायांच्या पगारात वाढ केली. तसेच गरिबांसाठी धान्याची कोठारे खुली केली होती. इ.स. 1422 ते 1423 ह्या वर्षी संपूर्ण दख्खनच्या प्रदेशात अतिशय तीव्र स्वरुपाचा दुष्काळ पडला होता त्यामुळे तीन वर्ष धान्याचा दुष्काळ होता. तर इ.स. 1589, 1623, 1624, मध्ये सुध्दा महाराष्ट्राच्या काही भागात दुष्काळ पडल्याचे दिसून येते. इ.स. 1629 ते 1630 मध्ये संपूर्ण दख्खनच्या भागत मान्सूनचा पाऊस पडला नाही त्यामुळे या दुष्काळाचे परिणाम संपूर्ण मुलुखाला भोगावे लागले. त्यामुळे कित्तेकांना स्थलांतर करावे लागले.[10] कवी परमानंद लिहितात "देशात (निजामशाही) पाऊस न पडल्याने धान्य खूप महाग झाले ….. खाण्यास काही न मिळाल्याने सर्वत्र हाहा:कार उडून पशुपशूस व माणसे माणसास खाऊ लागली."[11] दुष्काळाचा प्रभाव एवढा जबरदस्त होता की त्यामुळे धान्याची टंचाई निर्माण होऊन रयतेवर उपासमारीची पाळी आली. अनेकांनी स्थलांतर केले व कित्तेक मरण पावले. या सततच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे दख्खनचा प्रदेश निर्जन बनला होता. विनकरी, धोबी, रंगारी यासारखे कारागीर लोक पिडित होऊन अन्नासाठी इतरत्र भटकत होते. दख्खनच्या बहुतांशी भागातील लोक अन्नासाठी इतरत्र हिंडत होते. गुजरात, महाराष्ट्र आणि गोवळकोंडा इत्यादी प्रदेश जवळपास बेचिराख झाला होता. एवढी भयानकता व भिषणता या दुष्काळाने निर्माण केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य लोकशाही राज्य होय. भारताच्या इतिहासात समतेला महत्त्व देऊन 'मराठा' या वृत्तीवाचक समूहातील कायस्थ प्रभू, कुणबी, माळी, कुंभार, न्हावी, मराठे, लोहार, धनगर, रामोशी, कोळी, मातंग, महार, मुसलमान, या सर्वांना स्वराज्य घडविण्यासाठी सैन्यात घेतले. त्यांच्या वकुबाप्रमाणे त्यांना अधिकार व पदे दिली. समता व एकतेच्या महान तत्त्वाचा स्वराज्य स्थापनेत खरा उपयोग करुन घेतला. स्वराज्य स्थापनेबरोबर कडक असे निर्बंध घातले होते. "दौडीत बाया-बापड्यांवर हात टाकू नये, हात टाकले तर कलम केले जातील अशा शिक्षा देणे. मोहिमेत बाई, बटकीण, बायको बरोबर असू नये अन्यथा गर्दन मारली जाईल. छावणी टाकतांना गावाच्या बाहेर टाकावी. पाणवठ्यावरील पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर करु नये. अन्यथा जनतेला पाणी पुरणार नाही. अशा प्रकारच्या सूचना व नियम सैनिकांना दिले होते.

प्रशासनात सरनोबत, मुजुमदार व कारकून यांना सक्त आदेश होते. शत्रूंच्या बायका-मुलांना हात लावू नये. देवालयांची नासधूस करु नये. सक्तीचे धर्मांतर व शेतकऱ्यांचे बैल लुटू नयेत. नाईलाज म्हणून ओझे वाहण्याकरिताच त्यांचा वापर करावा व त्यासाठी लोक त्यांना मदत करीत होते. यावरुन शुत्रूपक्षातील जनता त्यांना विरोध करीत नव्हती. शत्रूपक्षातील जनतेची काळजी स्वत:च्या स्वराज्यातील रयतेची काळजी व आपल्या सैन्याची काळजी हे सैनिकी व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती.

अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी खंडणी, चौथाई, रयतेची पिळवणूक करतील त्यांच्याकडून वसूली, शत्रूपक्षातील जनतेचे आर्थिक शोषण करणाऱ्या श्रीमंताची लूट केली. स्वत:च्या स्वराज्यात शेती हेच रयतेचे मुख्य साधन होते. त्यातून येणारा महसूल सैन्यांचा खर्च व त्यांचा दाणागोटा यासाठीच वापरला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या सैनिकांना घालून दिलेले नियम व आदेश हे पहिल्या आदर्श लोकशाहीची तत्त्वे होती. त्यांनी नियम फक्त केले नाहीत तर प्रत्यक्षात अमलात आणले. परमुलुखातील लुटीसंबंधी नियम केले. लुटीत जमा झालेली संपत्ती स्वराज्याच्या खजिन्यातच जमा केली. तसेच त्याची नोंदही ठेवली जाई. त्यावेळचे इतर राजे लोक लुटलेला पैसा सैनिकांना वाटत. परंतू ती रीत चूकीची मानून सैनिकांना पगार दिला. त्यामुळे गैरमार्गाने जास्तीत जास्त लूट करणाऱ्यांवर पायबंद बसला. सैनिकांना तसे आदेश होते की, लूट कमी किंवा जास्त मिळो तुमचे पगार मात्र वेळेवर मिळतील. लुटीचा खजिना हा स्वराज्यातच जमा झाला पाहिजे व स्वराज्याच्या कामीच वापरला गेला पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या साहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंतांना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती व ती तंतोतंट पाळली जात असत.

प्रशासनात विविध जातीमधील गुण ओळखून त्या पद्धतीचे काम त्यांच्यावर सोपविले. पण हे करतांना जाती-जातीतला भेदभाव संपविला. सैन्यप्रमुख वेगळा, दारुगोळयाचा प्रमुख वेगळा, हिशेब ठेवणारा वेगळा, सबनीस, कारखानीस, हवालदार असे जरी अधिकारी होते, परंतू सर्वांचा दर्जा एकच. सर्वांना नियम एकच. फक्त त्यांच्या वकुबाप्रमाणे कामे वाटून दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेस त्रास न देण्याविषयी आपल्या सैन्यांना कडक सूचना केलेल्या होत्या. सैन्यरचना अत्यंत कुशलतेने हाताळली. रयतेच्या त्रास कमी केला. या धोरणाविषयी दत्ता भगत लिहितात. 'सरनोबत, मुजुमदार, कारकून यांना जहागिऱ्या देण्याऐवजी शिवाजी महाराजांनी वेगळे वेतन द्यायला सुरुवात केली आणि त्यांच्या मालकीची परंपरागत जमिन असलीच तर सामान्य रयतेप्रमाणे मानली जाऊन दरवर्षी झालझाडा घेतलाजाईल, असा आदेश काढला. कुणालाही एखादे गाव इनाम अथवा मोकासा देऊ नये. त्याऐवजी रोख ऐवज द्यावा, असा निर्णय घेतला. लष्कराला जे हवे ते त्यांनी कारकुनामार्फत घ्यावे. जनतेकडून परस्पर मिळवू नये. यामुळे स्थानिक पातळीवर सैन्याच्या बळावर पुंडाई निर्माण होणे यास पायबंद बसला. जनतेचा संबंध फक्त मुलकी अधिकाऱ्यांशी येऊ लागला. लष्कराचा जनतेशी संबंध तुटला. लष्कराची नाळ प्रत्यक्ष छत्रपतींशी जोडली गेली."

सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रातील समाज हा जाती आणि पोटजातीमध्ये विभागला होता. या काळात जातीव्यवस्था कडक होती आणि त्यामुळे आर्थिक विषमताही मोठ्याप्रमाणात होती. समाजात जहागीरदार आणि वतनदार यांचे प्रभुत्व होते. तसेच धर्मांतरीत मुसलमांनाचे वर्चस्व समाजावर होते. अशा विषम समाजात राहूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रनिर्मीतीचे कार्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासनाच्या सोईसाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. पेशवा, मुजुमदार किंवा अमात्य, सेनापती, सुरनिस किंवा सचिव, वाकनिस किंवा मंत्री, पंडीतराव, डबीर किंवा सुमंत, न्यायाधिश हे अष्टप्रधान मंडळाची निवड करतांना छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यक्षमतेवर भर दिलेला दिसतो.

केवळ स्वराज्य स्थापन करुनच छत्रपती शिवाजी महाराज स्वस्थ बसले नाही तर ते सुराज्य

कसे होईल याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली. जुलुम-जबरदस्ती, वेठबिगार, गुलामी, अस्पृश्यता ह्या गोष्टींना स्वराज्यात थारा नव्हता. साधुसंतांना पूर्ण मोकळीक होती. शेतकरी व्यापारी निर्भय होते. स्त्रीयांचा पूर्ण आदर होता. धार्मिक स्थळांना, ग्रथांना हात लावण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य पूर्ण न्यायाचे होते. स्वराज्यात सर्वांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. इतर धर्मियांना छत्रपती शिवाजी महाराज अतिशय आदराने वागवित होते. इतर धर्माची धर्मस्थाने कोणीही नष्ट करु नयेत याची ते विषेश काळजी घेत असे. स्वारीवर मराठा सैनिकांनी धर्मस्थळांचा विध्वंस करु नये आणि धर्मग्रथांचा अवमान करु नये अशा सक्त सुचना मराठा सैनिकांना देण्यात येत असे. मशिदीची आणि मुसलमान साधुसंतांना देण्यात आलेली इनामे छत्रपती शिवाजी महाराजांनी चालू ठेवण्याची अनेक उदाहरणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही एका जातीचे नेतृत्व केल्याचे दिसून येत नाही. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्य निर्मिती करतांना सर्व जाती जमातींना समाविष्ट करुन घेतले होते. त्यात मराठे, ब्राम्हण, हेटकरी, प्रभू, रामोशी, महार, मुसलमान या सर्वांचा समावेश होता.

**निष्कर्ष :**

मोगल सत्तेच्या जुलमाखाली स्वातंत्र्य् कधीच उधवस्त झाले होते. गुलामीत जन्मणे अत्याचार, अन्वित छळ सहन करीत मरणे एवढेच मराठी जनतेच्या नशिबी होते. सरदार, वतनदार गुलामगीरीतच मोगलांना मुजरे करत होते. अशा जुलमी गुलामगीरीत बलाढ्य मोगल, निजाम, आदिलशाही सत्तेविरुध्द लढा देण्याचे धारिष्ट्य शिवाजी महाराजांनी केले असे दिसून येते.

ऐतिहासिक शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमुख किंवा पाटील यांच्याकडे होती. शेती आधारित अर्थव्यवस्था होती उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय होता. गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्यागावची आर्थिक व्यवस्था पूर्वीसारखीच असे सहाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांना कर्तृत्ववान माणसांची कदर होती आणि अशी माणसे आपल्या भोवती जमवून राजांनी त्यांना प्रेरणा दिली. राजांचे सैन्याधिकारी, मुलकी कारभारी, सुभेदार आणि किल्लेदार, सेनापती आणि आणि आरमार प्रमुख ह्यांच्यात अनेक जातींचे आणि धर्माचे लोक होते. यावरुन धर्मनिष्ठेपलिकडे जाऊन एकीचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे दिसून येते. शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या साहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंताना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी हेर खात्याला स्वराज्य कार्यात अग्रस्थान दिले होते. त्यांची प्रत्येक योजना हेरांकडून मिळालेल्या अचूक बातम्या नुसारच आखली जाई, अर्थातच शिवाजी महाराजांच्या यशाचे रहस्य लक्षात घेताना त्यांच्या हेर खात्याचा शिवाजी महाराजांच्या यशात फार मोठा वाटा होता असे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज फक्त देवळे किंवा धर्मकार्ये याकरिता इनामी जमिनी देत असे. अशी इनामे ही सार्वजनिक निधीसारखी असत. इनामी जमिनी देत असताना जात, धर्म हा विचार त्यांनी कधीही मनात आणल्याचे दिसून येत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात आणि न्यायव्यवस्थेत धर्माची किंवा धर्मकारण्यांची ढवळाढवळ होऊ दिली नाही. आपला धर्म हा त्यांनी राज्याचा

मानला नाही. शिवाजी महाराजांनी त्यांच्या धर्मनिरपेक्ष स्वराज्यात सर्वांसाठी समान न्यायाचे तत्त्वे स्विकारली.

**संदर्भ सूची :**


1. पाटील, सुभाष; बैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 9
2. पाटील, सुभाष; बैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 35
3. कुलकर्णी, अ. रा; खरे ग. ह. (संपा.)- मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, 1985, पृ. क्र. 335
4. कठारे, अनिल; घोडके जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008, पृ. क्र. 172
5. कुलकर्णी, अ. रा; खरे ग. ह. (संपा.)- मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, 1985, पृ. क्र. 342
6. कित्ता, पृ. क्र. 343
7. कित्ता, पृ. क्र. 344
8. पानसरे, गोविंद-शिवाजी कोण होता?, लोकवाङ्मय गृह भुपेश गुप्ता भवन 85, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई, 2013, पृ. क्र. 7
9. पाटील, सुभाष; बैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 35
10. कित्ता, पृ. क्र. 37
11. किता 38
12. कठारे, अनिल; घोडके जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008


**वर्तमानपत्रे, मासिके :-**


1. लोकसत्ता
2. मराठा
3. लोकमत
4. देशोन्नती
5. सकाळ
6. मातृभूमी
7. दिव्य मराठी
8. लोकराज्य